महाराष्ट्र वन विभाग

महाराष्ट्र शासन
• वन विभाग •

दुरध्वनी क्रमांक : 02527/272096
फॅक्स क्रमांक : 02527/272096
ईमेल : dcfshahapur@gmail.com,
dycfshahapur@mahaforest.gov.in

# उप वनसंरक्षक, शहापूर वनविभाग, शहापूर यांचे कार्यालय

शहापूर-आसनगांव रोड, जूना आग्रारोड, आसनगांव, मु.पो.ता. शहापूर, जि. ठाणे 421 601

क्रमांक - कक्ष-6(3)/20/जमीन/ 9020 /2021-22 दिनांक 6 / 10 / 2021

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रा.)
ठाणे

विषय:- Diversion of 0.02.7 ha. Protected forest land for construction of approach road in favour of Shri. K. G. Jadhav at Village Vasind Taluka Shahapur District Thane in the State of Maharashtra.

संदर्भ:- 1) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17/नोसेल/2/आयडी-12890(73)/587/21-22, दिनांक 20/07/2021
2) आपलेकडील पत्र क्र. कक्ष-10/वसं/प्र.क्र.39/20-21/188/21-22, दिनांक 30/07/2021

विषयांकित प्रकरणी श्री. कृष्णा गजानन जाधव (प्रकल्प यंत्रणा) यांनी वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत त्यांचे मालकीचे मौजे वासिंद येथील सर्व्हे क्रमांक 196/अ/2 चे क्षेत्रामध्ये जाणे-येणेकामी मौजे वासिंद येथील संरक्षित वन सर्व्हे क्रमांक 196/अ1 मधून पोहोच रस्ता तयार करणेकामी 0.02.7 हेक्टर वनजमीन मागणीबाबत सादर केलेला प्रस्ताव विहित मार्गाने अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांचेकडे सादर करणेत आला असता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म.रा. नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र. 1 अन्वये उपस्थित केलेल्या त्रुटींचा पूर्तता अहवाल या कार्यालयाचे शिफारशीसह खालीलप्रमाणे सविनय सादर करण्यांत येत आहे.

| अ.क्र. | उपस्थित त्रुटी | केलेली पूर्तता |
|---|---|---|
| 1. | प्रस्तावित प्रकल्पाची KML File प्रस्तावामध्ये नमूद गांव/ Compartment/ सर्व्हे क्रमांक निहाय Properties दर्शविलेली नाही. सुधारीत प्रस्तावित क्षेत्राची KML File 3 प्रती C.D. मध्ये या कार्यालयास सादर करण्यात यावी व Parivesh Portal वर सुध्दा upload करण्यांत यावी. | सदर सुचनांचे अनुषंगाने सुधारीत KML File 3 प्रती C.D. मध्ये यासोबत सादर करण्यांत येत आहे. |
| 2. | पर्यायी वनीकरण KML File मध्ये प्रकल्प यंत्रणेनी निवड करण्यात आलेले क्षेत्रावर वनीकरण दिसून येतो. सदरहू पर्यायी वनीकरणासाठी निवड करण्यात आलेल्या क्षेत्रावर वनीकरण विरहीत जागेची निवड करण्यात यावी. तसेच पर्यायी वनीकरण KML File सादर करतेवेळी त्याची Properties सुध्दा दर्शविण्यांत यावे. | सदर प्रस्तावांतर्गत वळतीकरण करावयाचे क्षेत्र 1 हे.आर पेक्षा कमी असल्याने 1 हे.आर अवनत वनक्षेत्रावर पर्यायी वनीकरण प्रस्तावित करणेत आलेले असून सदर क्षेत्र आजमितीस लागवडीस योग्य असून त्याबाबतचे प्रमाणपत्र प्रस्तावामध्ये जोडणेत आलेले आहे. तसेच सदर क्षेत्राची सुधारीत KML File 3 प्रती C.D. मध्ये यासोबत सादर करण्यांत येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| 3. | 3 alternative alignment ची KML file C.D. मध्ये सादर करण्यात आलेली नाही. | प्रकल्प यंत्रणेचे मालकीच्या जागेच्या चारही बाजूनी संरक्षित वनाचे क्षेत्र असून प्रकल्प यंत्रणेने त्यांचे जागेमध्ये जाणे-येणेकरीता सदर संरक्षित वनातील नाल्यावर सन 2017-18 मध्ये विनापरवाना सिमेंट स्लॅप टाकल्याने त्यांचेविरुध्द वनगुन्हा नोंद करणेत आलेला आहे. त्यामुळे त्याच रस्त्याचे नियमीतीकरण करणे आवश्यक असल्याने अन्य दोन पर्यायांची तपासणी करणेचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे 3 alternative alignment ची KML file जोडणेत आलेली नाही. |
| 4. | केंद्र शासनाने दिनांक 28/03/2019 रोजी प्रकाशित केलेल्या Handbook मधील Para क्रमांक 1.15 मधील मार्गदर्शक सुचनाचे अनुषंगाने सदर प्रकल्प site-specific आहे काय? हयाबाबत अभिप्राय सादर करण्यात यावा. | प्रकल्प यंत्रणेचे मालकीच्या जागेच्या चारही बाजूनी संरक्षित वनाचे क्षेत्र असून प्रकल्प यंत्रणेने त्यांचे जागेमध्ये जाणे-येणेकरीता सदर संरक्षित वनातील नाल्यावर सन 2017-18 मध्ये विनापरवाना सिमेंट स्लॅप टाकल्याने त्यांचेविरुध्द वनगुन्हा नोंद करणेत आलेला आहे. त्यामुळे त्याच रस्त्याचे नियमीतीकरण करणे आवश्यक असल्याने केंद्र शासनाने दिनांक 28/03/2019 रोजी प्रकाशित केलेल्या Handbook मधील Para क्रमांक 1.15 मधील मार्गदर्शक सुचनाचे अनुषंगाने सदर प्रकल्प site-specific आहे. |

(व. तु. घुले)
उप वनसंरक्षक
शहापूर वनविभाग, शहापूर

प्रतिलिपी:- श्री. कृष्णा गजानन जाधव (प्रकल्प यंत्रणा), रा. भातसई, पो. वेहळोली, ता. शहापूर, जि. ठाणे यांचेकडे माहिती तथा आवश्यक कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.